# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-२४/२०२५** **दिनांक- १७/०१/२०२५**

## प्रेस नोट

### महिलेचे अपहरण करुन खुन करणाऱ्या आरोपींना जन्मठेपीची व द्रव्यदंडाची शिक्षा

अर्नाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८६/२०१६ भादविस कलम ३०२, ३६४(अ), ३८६, २०१, १२० (ब), १०९, ३४ मधील फिर्यादी नामे किसनलाल सुंदरलाल कोठारी वय ५४ वर्षे राहणार- विरार (प) यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपीत नामे १) मोहितकुमार किसनदास भगत वय २५ वर्शे रा. ग्लोबलसिटी विरार (प), २) रामअवतार छोटेलाल शर्मा, वय २६ वर्षे, रा. एम बी इस्टेट विरार (प), ३) शिवा राजकुमार शर्मा, वय २५ वर्षे, रा. सदर, ४) युनिता शरवंदन, वय ३५ वर्षे, रा. ग्लोबलसिटी विरार पश्चिमयांचे विरुध्द मा. वसई न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर गुन्हयाचे तपास पथकामध्ये पोनि/ कोल्हे, पोनि/होनमाने, सपोनि/शेंडगे, सपोनि/शिवले यांनी कर्तव्य बजावले

सदर गुन्हयाचे सुनावणीचे वेळी श्री जयंत बजवळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३ विरार, श्री विजय लगारे, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग व अर्नाळा पोलीस ठाण्याचे पोनि/ विजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ग्रेड पोउनि/दशवंतराव, पोहवा/खांडेकर, पो अमं/घरत यांनी साक्षीदारांना मा. न्यायालयात साक्षी बाबत माहिती देवुन सदर गुन्हयात आरोपी क्रमांक १ ते ४ यांना जन्मठेप शिक्षा आरोपी क्रमांक १ ते ३ यांना १८,०००/- रुपये दंड व आरोप क्रमांक ४ यास ७,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ०६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावलेली आहे.

-------oooo--------